**विविध पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी सेवाभावी संस्थांची निवड करण्यासाठीचे धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००२/प्रक्र-५३७/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२., दिनांकः ३० मार्च, २००२.**

**वाचा :-१)** शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. क्र.ग्रापापु-१०९९/प्र.क्र-३२८/ पापु-०७. दिनांक २७ जुलै, २०००.

**२)** शासन निर्णय. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग. क्र. ग्रापापु-१००१/ प्रक्र-१९०/ पापु-०७. दिनांक ३ सप्टेंबर २००१.

**३)** शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१००१/ प्रक्र-३३०/ पापु-०७, दिनांक १४ फेब्रुवारी, २००१.

**प्रस्तावना :-**

राज्यात राबविल्या जात असलेल्या विविध पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी **सेवाभावी संस्थांचा** सहभाग मोठया प्रमाणावर आवश्यक आहे. विशेषतः राज्य शासनाने **क्षेत्र सुधारणा धोरणांतर्गत** पिण्याचे पाणी पुरवठा व स्वच्छतेचे नवीन पुरोगामी धोरण जाहिर केल्यानंतर ग्राम स्तरावरील समुदायांवर जी मोठी जबाबदारी टाकलेली आहे आणि जे प्रचंड अधिकार त्यांना दिलेले आहे त्याचा विचार करता ग्राम स्तरावर **क्षमता निर्मितीसाठी** (Capacity Building ) सेवाभावी संस्थांचा सहभाग अत्यंत आवश्यक झालेला आहे.

२. केंद्र शासनाचे राज्यात ४ जिल्हयात (अमरावती, धुळे, नांदेड, रायगड) सुरु असलेले क्षेत्र सुधारणा प्रकल्प, जर्मन शासनाच्या सहकार्याने सुरु असलेले ३ जिल्हयातील (पुणे, अहमदनगर, औरंगाबाद) पिण्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प, केंद्र शासनाच्याच आर्थिक निधीतून इतर ५ जिल्हयांत (चंद्रपूर, यवतमाळ, सांगली, औरंगाबाद, रत्नागिरी) सुरु असलेले स्वच्छता प्रकल्प आणि पाणी पुरवठयाच्या नवीन धोरणाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी इतर ४ जिल्हयांत (चंद्रपूर, यवतमाळ, सांगली, रत्नागिरी) सुरु असलेले प्रकल्प या सगळयांमध्ये सेवाभावी संस्थांची महत्त्वाची भूमिका आहे.

३. जागतिक बँकेने यापूर्वी १९९२ ते १९९८ या कालावधीत राज्यात राबविलेल्या प्रस्तावातही सेवाभावी संस्थांची मोठी जबाबदारी होती. आता मागणी आधारीत, लोकसहभागातून जागतिक बँकेच्या सहाकार्याने जो दुसरा प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे त्यामध्येही सेवाभावी संस्थांचा सहभाग मोठया प्रमाणावर लागणार आहे. किंबहुना जागतिक बँकेने जो **४.२० लाख डॉलर्सचा** निधी हा प्रकल्प तयार करण्यासाठी मंजूर केला आहे. त्यामध्येही सेवाभावी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे.



४८९

४.	राज्य शासनाने **शिवकालिन पाणी साठवण योजना** राज्यामध्ये राबविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १४.२.२००२ रोजी निर्गमित केला आहे. त्यानुसार सुध्दा सेवाभावी संस्थांची महत्त्वाची भूमिका या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राहणार आहे. याशिवाय **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात** जिल्हयांचा आढावा घेता सेवाभावी संस्थांनी ग्राम स्तरावर प्रचार, प्रसिध्दी व क्षमता निर्मितीसाठी विनामूल्य महत्त्वाची भूमिका बजावली आहे असे दिसून येते.

**५.	केंद्र शासन, जागतिक बँक व जर्मन शासनाच्या** या सर्व प्रकल्पात **राज्य, जिल्हा व ग्राम स्तरावरील पदाधिकारी, अधिकारी, राजकीय नेते, विचारवंत, ग्राम समुह, जिल्हा परिषद, पंचायत समिती** तसेच ग्राम पंचायतीचे पदाधिकारी , अधिकारी तसेच तंत्रज्ञ, महिला, तरुण, विद्यार्थी यांची नव्या धोरणाप्रती जाणीव व बांधिलकी निर्माण करणे आणि त्या अनुषंगाने त्यांची **क्षमता निर्मिती** (Capacity Building ) करण्यासाठी आवश्यक **प्रचार , प्रसिध्दी व प्रशिक्षण** यासाठी हा सर्व कार्यक्रम सक्षम, सेवाभावी आणि योग्य अशा सेवाभावी संस्थेकडून राबविला जावा अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे **सुयोग्य सेवाभावी संस्थांची निवड** हा या संपूर्ण कार्यक्रमामध्ये एक महत्त्वाचा भाग ठरतो.

**६.**	योग्य सेवाभावी संस्थेची निवड व्हावी यासाठी केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना व जागतिक बँकेने यासाठी दिलेले काही निकष यांचा विचार करुन, **पात्र सेवाभावी संस्थांची योग्य निवड व्हावी म्हणून सेवाभावी संस्थंची अर्हता आणि निवडीची प्रक्रिया** याबाबतच मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब **शासनाच्या विचाराधीन होती.**

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करुन सेवाभावी संस्थांच्या निवडीसाठी पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेतः-

**सेवाभावी संस्थांच्या निवडीचे निकष व पध्दतः-**

**अ)**	प्रथम राज्य स्तरावरुन जाहिरात देऊन खालील पात्रता व अर्हता असलेल्या सेवाभावी संस्थांना प्राथमिक अर्ज करण्यासाठी पाचारण करावे.

I)	योग्य त्या कायद्याखाली (Society Registration Act/ Charity Trust Act) संस्थेची राज्य स्तरावरुन दिलेल्या जाहिरातीपूर्वी किमान **३ वर्षापूर्वीची नोंदणी** झाली असावी.

**II)**	संस्थेची **नोंदणी सेवाभावी संस्था म्हणून** झालेली असावी, व संस्थेच्या पोट नियमात **पाणी पुरवठा स्वच्छता** याबाबत कामकाज करण्याची तरतूद असावी.

**III)**	संस्थेची कोणत्याही **शासकीय संस्थेशी, राजकीय पक्षाशी, कामगार संघटनांशी, धार्मिक संघटनेशी** बांधिलकी, भागिदारी अथवा संबंध नसावेत. तशी स्पष्ट तरतूद संस्थेच्या पोट नियमात नमूद असावी.

**IV)**	**संस्थेच्या सदस्यत्वात कार्यरत शासकीय अधिकारी, शासकीय उपक्रमातील कार्यरत अधिकारी, व्यवस्थापनासाठी शासनाची आर्थिक मदत उपलब्ध होणा-या संस्थेतील पदाधिकारी व कर्मचारी,**



४९०

**राजकीय पक्षाचे सक्रिय सदस्य** अशा व्यक्तींचा समावेश नसावा. तसे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत घेण्यात यावे.

**V)** **संस्थेच्या नियामक मंडळावर/ संचालक मंडळावर शासकीय, निमशासकीय, शासन मदत प्रत्यक्ष मिळणा-या संस्था यातील पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी, सदस्य, ग्राम पंचायतीतील पंच, विद्यमान मा. आमदार, मा. खासदार** यांचा किंवा त्यांचे निकटतम नातेवाईक यांचा समावेश नसावा.
(निकटतम नातेवाईक या संज्ञेत **पती/ पत्नी, आई-वडिल, मुलगा-मुलगी, बहिण-भाऊ, सुन-जावई, सासू-सासरे नातू/ नाती व त्यांचे पती/पत्नी** यांचा समावेश राहिल.)

VI) सेवाभावी संस्थेतील कर्मचारी, सेवक, तज्ञ हे शासकीय सेवेतील व्यक्ती नसावी. तसेच , असे सेवक कोणत्याही राजकीय पक्षाचे अथवा धार्मिक संघटनेचे सक्रिय सदस्य नसावेत.

VII) संबंधित संस्थेच्या उत्पादनाचे स्त्रोत हे **स्वनिधी** किंवा संस्थेवर सोपविलेल्या कामातून त्यांना मिळालेले मानधन/ मोबदला शुल्क/ भरपाई या स्वरुपाचे असावे. संस्थेच्या दैनंदिन खर्चासाठी अथवा प्रशासकीय खर्चासाठी कोणतेही स्वतंत्र शासकीय अनुदान उपलब्ध होत नसावे.

VIII) संस्थेने गेल्या ३ वर्षात केलेली कामे व या पैकी पाणी पुरवठा व स्वच्छता या बाबीशी निगडीत कामे यांची स्वतंत्र यादी व आर्थिक उलाढाल नमूद असावी.

IX) संस्थेचे नियामक मंडळ/ कार्यकारी मंडळावरील सदस्याचा सामाजिक व सेवाभावी कार्याचा तपशील, विशेषतः त्यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात केलेले काम याचा तपशील.

X) नियामक मंडळात महिलांची संख्या व संस्थेच्या नियुक्त व तातपुरत्या सेवकांतील **महिलांची संख्या** हा निवडीचा एक घटक असेल. तशी माहिति जोडावी.

XI) संस्थेचे हिशोब व्यवस्थित ठेवलेले असावेत व त्यांचे अद्ययावत लेखा परीक्षण झालेले असावे.

XII) संस्थेविरुध्द कोणत्याही न्यायालयात किंवा शासकीय प्राधिकरणाकडे **भ्रष्टाचाराबाबत, अफरातफरीबाबत, गैरव्यवहाराबाबत** अथवा **अयोग्य कामकाजाबाबत याचिका/ चौकशी प्रलंबित नसावी.** संस्थेचे नाव कोणत्याही यंत्रणेने **काळया यादीत टाकलेले नसावे.** (संस्थेविरुध्द केवळ तक्रार आहे या मुद्यावर त्या तक्रारीत अन्यथा तथ्य असल्याशिवाय संस्थेला अपात्र ठरविण्यास हे कारण पुरेसे असणार नाही. )

XIII) संस्थेची राज्यातील पूर्वपिठीकेनुसार सर्वसाधारण विश्वासार्हता व मान्यता याचा विचार करण्यात यावा. यासाठी संस्थेने त्यांचे अर्जाला योग्य ते संदर्भ (Reference) जोडावेत.

**(ब)** वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जाची **प्राथिमक छाननी** सचिव (पा.पु.व स्व.) यांनी नेमलेल्या **उपसचिव/सह सचिव** दर्जाच्या अधिका-यांच्या अध्यक्षतेखालील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत समितीतर्फे करण्यात येईल. या छाननी समितीत **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व जिल्हा परिषदांचे काही मुख्य कार्यकारी अधिकारी** यांचा समावेश करण्यात येईल.



४२९

**(क)** अशी छाननी झालेली यादी त्यानंतर सचिव (पा.पु.व स्व.) यांना सादर करण्यात यावी.
**(ड)** वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या यादीवर **अंतिम निर्णय घेण्यासाठी** पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. सचिव (पा.पु.व स्व.) | अध्यक्ष |
| २. सचिव (सार्वजनिक आरोग्य) | सहअध्यक्ष |
| ३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ४. कपार्टचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. युनिसेफचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६. राज्यातील एक विभागीय आयुक्त | सदस्य |
| ७. यादीत समाविष्ठ न होऊ इच्छिणा-या एक राज्यस्तरीय मान्यवर सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ८. राज्यस्तरीय पत्रकार प्रतिनिधी | सदस्य |
| ९. संचालक (पीपीएमयू) | सदस्य-सचिव |

(इ) ही समिती छाननी केलेल्या यादीतील संस्थांना **प्रत्यक्ष मुलाखतीला** बोलावू शकेल. गरजेनुसार समितीतील सदस्य किंवा समितीने नियुक्त केलेली राज्य अथवा जिल्हा स्तरीय अधिकारी, शासकीय अधिकारी अथवा जिल्हा परिषद अधिकारी यांच्या चमूमार्फत संस्थेच्या कामकाजाच्या ठिकाणी भेट देऊन प्रत्यक्ष माहिती घेऊ शकेल. वरील माहितीच्या अनुषंगाने समिती कोणत्या सेवाभावी संस्थांची नावे अंतिम यादीत अंतर्भूत करावी याबाबत निर्णय घेऊन शासनास शिफारस करेल.
(ई) मा. सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार शासन अंतिम निर्णय घेईल.

**संस्थांना नियुक्ती देण्याची पध्दतः-**

यादीत अंतर्भूत झालेल्या सेवाभावी संस्थांची नेमणूक राज्यातील **जिल्हा परिषदा, ग्राम पंचायती, शासकीय विभाग, आंतरराष्ट्रीय वित्तीय मदत करणा-या संस्था** आवश्यकतेनुसार विविध कार्यक्रमांसाठी करु शकतील. त्यासाठी यादीतील कोणत्या संस्थेची निवड करावी हे सुध्दा संबंधित सेवा आवश्यक असणा-या संस्था/ यंत्रणा सेवेची गरज व स्तर विचारात घेऊन या यादीतील किमान तीन सेवाभावी संस्थांकडून व्दिलिफाफा पध्दतीने **तांत्रिक व आर्थिक** प्रस्ताव मागवून पारदर्शक पध्दतीने निवड करतील. **पॅनेलवर नसलेल्या कोणत्याही संस्थेची निवड करता येणार नाही.** एका संस्थेला एकावेळी किती कामे द्यावीत याबाबत शासन निकष ठरवू शकेल.

**संस्थेचे नाव कमी करण्याची पध्दतः-**

यादीतून एखाद्या संस्थेचे नाव संबंधित संस्थेच्या अकार्यक्षमतेमुळे अथवा अफरातफरीमुळे किंवा इतर काही अनुषंगिक कारणाने काढून टाकून तिला काळया यादीत टाकण्याचे अधिकार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीला असतील. संबंधित संस्थेला सुनावणी देण्यात येईल. सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीचा निर्णय अंतिम राहिल. त्यावर कोणतेही अपील शासन स्तरावर करता येणार नाही.



४e२

**सेवाभावी संस्थांच्या कामाचे स्वरुप :-**

लाभार्थी समुहांना त्यांच्या कामात **सहकार्य** करणा-या, कालांतराने हे सर्व काम गाव समुह आणि गाव समुहातील पदाधिकारी यांनीच करण्यासाठी त्यांची **क्षमता निर्मिती** करणे, **प्रशिक्षण देणे** व त्यानंतर कालांतराने स्वतः बाजूला होणे, जेणेकरुन गाव स्तरावर स्वतंत्ररित्या सर्व कामकाज बाहेरील कोणत्याही यंत्रणेच्या मदतीशिवाय होत राहिल अशी संकल्पना आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अनुषंगाने सेवाभावी संस्थांकडून जी विविध कामे अपेक्षित आहेत ती म्हणजे **समुह जागृती करणे, एकत्रित काम करण्यासाठी समुहाला उद्युक्त करणे, समुह क्षमता निर्मितीस मदत करणे, क्षमता निर्मिती करणे, महिला व मागासवर्गीय/ दुर्बल घटकांना योग्य स्थान मिळेल** यादृष्टीने त्यांची विशेषत्वाने जागृती करुन क्षमता निर्मिती करणे, **विविध प्रशिक्षणे देणे, लोकवर्गणी जमा करण्याची पध्दत समजावून देणे, हिशोब, वैयक्तिक स्वच्छता, देखभाल व दुरुस्ती इ.** कामासाठी कौशल्य निर्माण करणे, या सर्व बाबींसाठी लागणारी **कागदपत्रे ठेवण्याची पध्दत व व्यवस्थापन** इत्यादींसाठी गाव समुहाला व त्यातून सेवाभावी घटकांना तयार करणे अशा त-हेचे काम अपेक्षित आहे. साहजिकच या सर्व कामासाठी **सक्षम मनुष्यबळ** ज्या सेवाभावी संस्थांमध्ये आहे त्यांचीच निवड होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(बी. सी. खटुआ)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्य मंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त सर्व
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नवी मुंबई



४८३

मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नाशिक. पुणे. औरंगाबाद. अमरावती व नागपूर
नियोजन विभाग. मंत्रालय. मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.